# ‘शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती’

# सुधारित नियमावली २०२५

# ‘शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती’
# सुधारित नियमावली

**योजनेचा उद्देश :—**

शिवाजी विद्यापीठांतर्गत विविध संलग्न महाविद्यालयात, मान्यताप्राप्त संस्थेत तसेच विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर अधिविभागात उच्च शिक्षण घेणा—या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठाने ‘शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती’ निर्माण केली आहे.

**प्रस्तावना**

शिवाजी विद्यापीठाचे सध्याचे कार्यक्षेत्र पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा या तीन जिल्हयात विस्तारलेले आहे. या विद्यापीठांतर्गत असणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात विखुरलेली आहेत. अपु—या सोई सुविधा असतानाही विद्यापीठातंर्गत शिक्षण घेणारे विद्यार्थी मोठया चिकाटीने जिद्दीने उच्च शिक्षण घेतात. शिवाजी विद्यापीठातंर्गत शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी देशात तसेच देशाबाहेर उच्च पदावर कार्यरत आहेत. त्यामुळे हे विद्यापीठ नावारुपाला आले आहे. विद्यापीठाचा नावलौकिक असाच वाढत रहावा, म्हणून या विद्यापीठातंर्गत विविध संलग्न महाविद्यालयात, मान्यताप्राप्त संस्थात तसेच विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर अधिविभागात उच्च शिक्षण घेणा—या गुणवत्ताधारक विद्यार्थी/विद्यार्थीनी शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून त्यांना शैक्षणिक प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठाने सन १९९८—१९९९ पासून ‘शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती’ ची निर्मिती केली आहे. यासाठी विद्यापीठाने गुणवत्ता धारक विद्यार्थ्या बरोबरच आर्थिकदृष्टया दुर्बल, निराधार, दिव्यांग, गुणवंत खेळाडू, पारलिंगी विद्यार्थी तसेच शहीद लष्करी, निमलष्करी जवान आणि शहीद पोलीस यांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती देण्याचे ठरविले आहे. यामुळे त्यांच्यातील शैक्षणिक गुणवत्ता वाढीस प्रोत्साहन मिळेल व शिष्यवृत्तीच्या रुपाने त्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य मिळेल हा उद्देश आहे.

**सदर शिष्यवृत्तीचे नियम खालीलप्रमाणे आहेत.**

१. **नाव** : या शिष्यवृत्तीचे नांव ‘शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती’ असे राहील.

२. व्याप्ती

सदरची शिष्यवृत्ती शिवाजी विद्यापीठाच्या सर्व अधिविभागातील व संलग्नीत महाविद्यालयातील सर्व विद्याशाखेतील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास नियमित प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी/विद्यार्थिनींना देण्यात येईल. सदरची शिष्यवृत्ती संशोधन पदवी तसेच सर्व प्रकारच्या पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना तसेच बहिस्थ: म्हणून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी / विद्यार्थिंनींना देय असणार नाही.

३. शिष्यवृत्तीचे प्रकार पुढील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| अ) | सर्वसाधारण शिष्यवृत्ती (General Category Scholarship) — (फक्त गुणवत्तेच्या आधारे) |
| ब) | आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (Economically Weaker Sections Scholarship) — (गुणवत्ता व आर्थिक निकषांच्या आधारे) |
| क) | निराधार शिष्यवृत्ती (Destitute Scholarship) — (गुणवत्ता व कौटुंबिक परिस्थितीच्या आधारे) |
| ड) | दिव्यांग शिष्यवृत्ती ( Disability Scholarship) — (गुणवत्ता व दिव्यागांच्या प्रमाणाच्या आधारे) |
| ई) | गुणवंत खेळाडू शिष्यवृत्ती (Sports Person Scholarship) — (गुणवत्ता व खेळातील उल्लेखनीय कामगिरीच्या आधारे) |
| फ) | शहीद सन्मान शिष्यवृत्ती (Shahid Sanman Scholarship) — (गुणवत्ता व कुंठुबातील पात्र सदस्याकरिता) |
| भ) | पारलिंगी विद्यार्थी शिष्यवृत्ती (Transgender Students Scholarship) — (गुणवत्ता व पारलिंगी प्रमाणपत्राच्या आधारे) |

४. पात्रतेचे निकष

अ) सदरची शिष्यवृत्ती देताना संबंधित विद्यार्थी / विद्यार्थिनींच्या त्या मागील शैक्षणिक वर्षाच्या मार्च/एप्रिल मधील वार्षिक परीक्षेतील गुणांचा विचार केला जाईल. ज्या ठिकाणी मागील वर्षाची सत्र (सेमिस्टर) पध्दती आहे त्या ठिकाणी प्रथम व द्वितीय सत्रातील परीक्षेचे गुण एकत्रित करुन गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

ब) शिष्यवृत्तीसाठी मागील शैक्षणिक वर्षात मार्च/एप्रिल परिक्षेत किमान ६०% (टक्के) गुणांसह उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

क) श्रेणी अथवा उत्तीर्ण होण्यासाठी गुणात वाढ करताना विद्यापीठ नियमाप्रमाणे वापरलेल्या दंडकाचा लाभ गुणवत्तेसाठी विचारात घेतला जाणार नाही.

ड) शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थी/विद्यार्थिनीने शिष्यवृत्ती मंजूरीनंतर शिष्यवृत्ती ज्या विद्याशाखेतून प्राप्त केली आहे. त्याच विद्याशाखेतून पुढील शिक्षण शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयात / मान्यताप्राप्त संस्थेत / विद्यापीठ अधिविभागात नियमित विद्यार्थी म्हणून पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच सध्या शिकत असलेल्या महाविद्यालय/अधिविभागातून नामांकन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

ई) अभिमत विद्यापीठे व स्वायत्त महाविद्यालये/स्वायत्त मान्यताप्राप्त संस्थेमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सदरची शिष्यवृत्ती देय असणार नाही.

फ) पदवी अभ्यासक्रमाच्या भाग १ ला नियमित प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांने महाराष्ट्रातील कोणत्याही उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मंडळाने घेतलेली परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

ज) पदवी अभ्यासक्रमांच्या भाग २ व त्यापुढील तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या भाग १ साठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची मागील परीक्षा शिवाजी विद्यापीठामार्फतच उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

झ) शिष्यवृत्तीकरीता पात्र होण्यासाठी सदर विद्यार्थ्याने नियमित विद्यार्थी म्हणून पुढील वर्षामध्ये प्रवेश घेणे आवश्यक आहे.

ट) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती/एसटीसी/पीटीसी शिष्यवृत्तीचा लाभ घेणारे विद्यार्थी सदर शिष्यवृत्ती करीता पात्र ठरतील. तसेच राज्य शासनाची/केंद्र शासनाची इतर शिष्यवृत्ती घेणारे विद्यार्थी सदर शिष्यवृत्ती करीता अपात्र ठरतील

ठ) सदर शिष्यवृत्तीसाठी नियमित विद्यार्थी/ विद्यार्थिनीच पात्र असून यामध्ये विदेशी विघार्थ्यांचाही समावेश असेल, विदेशी विद्यार्थ्यांचा ओळखीचा पुरावा म्हणून पासपोर्ट ग्राहय धरण्यात यावा व फी बाबत इंटरनॅशनल अफेअर्स या विभागाचे पत्र ग्राहय धरण्यात यावे.

ढ) अर्जदार विद्यार्थी/विद्यार्थिनींनी त्यांचे स्वतःच्या नावे असलेल्या बॅकेच्या पासबुकची पहिल्या पानाची व आधारकार्डची छायांकित प्रत, नियमित विद्यार्थी प्रवेश पावती व मुळ गुणपत्रक छायांकित प्रत जोडणे अनिवार्य आहे.

**५. शिष्यवृत्तीची अनुज्ञेय रक्कम खालीलप्रमाणे राहील.**

- पदवी पातळीसाठी दरमहा रु.५००/—
- पदव्युत्तर पातळीसाठी दरमहा रु. १,०००/—
- सदरची शिष्यवृत्ती १० महिने कालावधीसाठी देय राहील.

**६. शिष्यवृत्तीची संख्या खालीलप्रमाणे राहील.**

अ) सर्वसाधारण गटातील शिष्यवृत्तींची संख्या मागील वर्षी मार्च/एप्रिल मध्ये झालेल्या विद्यापीठाच्या ज्या—त्या अभ्यासक्रमाच्या / विषयाच्या परीक्षेस बसलेल्या एकूण नियमित व प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी संख्येवर अवलंबून राहील व इतर गटातील

शिष्यवृत्तींचीं संख्या विद्याशाखानिहाय खालील तक्त्याप्रमाणे,

| अ. क्र. | विद्याशाखा/Faculty | शिष्यवृत्ती संख्या |
|---|---|---|
| १. | विज्ञान व तंत्रज्ञान Science and Techonology | १४ |
| २. | वाणिज्य व व्यवस्थापन Commerce and Management | १४ |
| ३. | मानवविज्ञान Humanities | १४ |
| ४. | आंतर—विद्याशाखीय अभ्यास Inter-disciplinary Studies | १४ |

ब) शिष्यवृत्तींची संख्या निश्चित झाल्यांनतर पात्र ठरलेल्या विद्यार्थी/विद्यार्थिनींपैकी गुणवत्तेनुसार शेवटी असणा—या विद्यार्थी/विद्यार्थिनीचे गुण समान असतील तर समान गुणांच्या विद्यार्थी/विद्यार्थिनींच्या शिष्यवृत्तीची तितकीच रक्कम व प्रशस्तीपत्र त्या पुढील संबंधित विद्यार्थी /विद्यार्थिनीस देय राहील.

क) उपरोक्त अ.क्र. ०३ येथील अ, ब, क, ड, ई, फ, भ येथे नमूद केलेल्या शिष्यवृत्ती प्रकारांना उपरोक्त नियम लागू असतील व प्रत्येक शिष्यवृत्तींच्या प्रकारासाठी खालीलप्रमाणे पोटनियम राहतील.

**७. सर्वसाधारण शिष्यवृत्तीचे पोटनियम**

अ) सदरची शिष्यवृत्ती फक्त गुणवत्तेच्या आधारे देण्यात येईल.

ब) शिवाजी विद्यापीठातील विविध विद्याशाखेतील पदवी व पदव्युत्तर वर्गासाठी प्रवेश घेवून त्यावर्षी त्या वर्गाच्या परीक्षेस बसलेल्या एकूण नियमित विद्यार्थ्यांपैकी प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी संख्येवर शिष्यवृत्तीची संख्या अवलंबून राहील. सदरची शिष्यवृत्ती ही वर्गनिहाय व विषयनिहाय असेल.

क) पदवी पातळीवरील भाग १ च्या शिष्यवृत्तीसाठी मागील वर्षाच्या मार्च/एप्रिल मधील महाराष्ट्रातील सर्व विभागातील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेचे (एच.एस.सी. बोर्ड) एकूण गुण ग्राह्म धरले जातील. जे विषय/ज्या विद्याशाखा उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (एच.एस.सी.) पातळीवर शिकविल्या जात नाहीत परंतू त्या पदवी पातळीवर शिकविल्या जातात. अशा विषयांना/विद्याशाखेच्या अभ्यासक्रमांना शिष्यवृत्ती देताना नियमित प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेच्या (एच.एस.सी.) अभ्यासक्रमांच्या एकूण गुणांचा विचार केला जाईल. उदा. एल.एल.बी. पाच वर्षाचा अभ्यासक्रम, बी.ए.बी.एड, अभियांत्रिकी अभ्यासक्रम इत्यादी
संलग्नित महाविद्यालये व अधिविभाग यांनी १२ वी वरून भाग १ करीता प्रवेशीत असलेल्या सर्व अभ्यासक्रमातील विद्यार्थ्याचे प्रत्येकी ०५ नामाकंन अर्ज भरून घ्यावेत.

ड) पदवी पातळीवरील प्रथम वर्गाला ६०० विद्यार्थ्यांच्या मागे एक शिष्यवृत्ती दिली जाईल व शिष्यवृत्तीची रक्कम दरमहा रु ५००/— अशी राहील. ज्या ठिकाणी विद्यार्थी संख्या ६०० पेक्षा एका संख्येने वाढली असेल अशा ठिकाणी पुढील विद्यार्थी पात्र होईल व सदर शिष्यवृत्तीची रक्कम दरमहा रु. ५००/— अशी राहील. सदरची शिष्यवृत्ती १० महिने कालावधीसाठी देय राहिल.

ई) पदवी पातळीवरील द्वितीय वर्गाला ५०० विद्यार्थ्यामागे ०१ शिष्यवृत्ती दिली जाईल व शिष्यवृत्तीची रक्कम दरमहा रु. ५००/— अशी राहील. ज्या ठिकाणी विद्यार्थी संख्या ५०० पेक्षा एका संख्येने वाढली असेल अशा ठिकाणी पुढील विद्यार्थी पात्र होईल व सदर शिष्यवृत्तीची रक्कम दरमहा रु. ५००/— अशी राहील. सदरची शिष्यवृत्ती १० महिने कालावधीसाठी देय राहिल.

फ) पदवीच्या तृतीय वर्षासाठी शिष्यवृत्ती देताना विद्यार्थ्यांच्या द्वितीय वर्षाच्या गुणवत्ता यादीवरून दिली जाईल सदर शिष्यवृत्ती ४०० विद्यार्थ्यांमागे ०१ अशी राहील व शिष्यवृत्तीची रक्कम दरमहा रु.५००/— अशी राहील. ज्या ठिकाणी विद्यार्थी संख्या ४०० पेक्षा एका संख्येने वाढली असेल अशा ठिकाणी पुढील विद्यार्थी पात्र होईल व सदर शिष्यवृत्तीची रक्कम दरमहा रु.५००/— अशी राहील. सदरची शिष्यवृत्ती १० महिने कालावधीसाठी देय राहिल.

ज) अभियांत्रिकीसाठी शाखानिहाय व शिक्षणशास्त्र साठी शिक्षण पध्दतीनुसार शिष्यवृत्ती दिली जाईल. सदर शिष्यवृत्तीची रक्कम दरमहा रु. ५००/— अशी राहील. एका अभ्यासक्रमामध्ये किमान ५ विद्यार्थी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

झ) वरील नियम पदवी पातळीवरील अभ्यासक्रमाच्या चौथ्या व पाचव्या वर्षासही लागू राहतील व ज्या ठिकाणी वैकल्पिक विषय निवडले जात नाहीत त्या ठिकाणी एकूण गुणांचा विचार केला जाईल.

ट) पदव्युत्तर पातळीवरील प्रथम वर्षासाठी शिष्यवृत्ती देताना (आवश्यक इंग्रजी विषय सोडून) पदवी पातळीवरील विषयाचे गुण विचारात घेतले जातील व दुस—या वर्षासाठी शिष्यवृत्ती देताना पदव्युत्तर पातळीवरील प्रथम वर्षाचे एकूण गुण विचारात घेतले जातील. जे विषय पदवी पातळीवर शिकवले जात नाहीत परंतू ते पदव्युत्तर पातळीवर शिकविले जातात अशा विषयांना/अभ्यासक्रमांना शिष्यवृत्ती देताना नियमित प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षाचे एकूण मिळालेल्या गुणांच्या बेरजेचा विचार एकत्रित (आवश्यक इंग्रजी विषय सोडून) केला जाईल.

ठ) पदव्युत्तर पातळीवरील वर्गाला/विषयाला ४०० विद्यार्थ्याच्या मागे एक शिष्यवृत्ती दिली जाईल. शिष्यवृत्तीची रक्कम दरमहा रु. १,०००/— अशी राहील. ज्या ठिकाणी विद्यार्थी संख्या ४०० पेक्षा एका संख्येने वाढली असेल अशा ठिकाणी पुढील विद्यार्थी पात्र होईल एका अभ्यासक्रमामध्ये किमान ०५ विद्यार्थी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
(वरील नियम पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या तिस—या वर्षासही लागू राहतील.)

## ८. आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्तीचे पोटनियम

अ) सदरची शिष्यवृत्ती गुणवत्ता व आर्थिक निकषांच्या आधारे देण्यात येईल.

ब) सदरची शिष्यवृत्तीसाठी निवड करताना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला ७० टक्के महत्त्व देण्यांत येईल.

क) उर्वरित ३० टक्के गुण खालील बाबींसाठी देण्यांत येतील.

ड) कौटुंबिक उत्पन्न — २० गुण
(तहसिलदारांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला शैक्षणिक वर्षाच्या लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षाचा ग्राह्य धरण्यांत येईल.)

| अ.क्र. | कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा | गुण |
|---|---|---|
| १. | रु.२,००,०००/— पर्यंत | २० गुण |
| २. | रु.२,००,००१/— ते रु.३,००,०००/— पर्यंत | १६ गुण |
| ३. | रु.३,००,००१/— ते रु.४,००,०००/— पर्यंत | १३ गुण |
| ४. | रु.४,००,००१/— ते रु.५,००,०००/— पर्यंत | १० गुण |
| ५. | रु.५,००,००१/— ते रु.८,००,०००/— पर्यंत | ०७ गुण |
| ६. | रु.८,००,०००/— पेक्षा जास्त असल्यास | अपात्र |

ई) विद्यार्थी हा ग्रमीण,दुर्गम,अतिदुर्गम भागात राहत असल्यास — १० गुण
यासाठी प्राचार्यांनी दिलेला दाखला विचारात घेतला जाईल.

१. ग्रामीण भागात राहत असल्यास — ०५ गुण
{आधारकार्ड जोडणे आवश्यक आहे.}

२. दुर्गम भागात राहत असल्यास — ०७ गुण
{आधारकार्ड व शासन निर्णय जोडणे आवश्यक आहे.}

३. अति दुर्गम भागात रहात असल्यास — १० गुण
{आधारकार्ड व शासन निर्णय जोडणे आवश्यक आहे.}

फ) सदर शिष्यवृत्तींची संख्या विद्याशाखानिहाय राहील. नामांकन अर्ज केलेल्या पदवी व पदव्युत्तर पातळीवरील विद्यार्थ्यांची वरील निकषांच्या आधारे एकच गुणवत्ता यादी तयार करुन प्रथम असलेल्या विद्यार्थ्यांना पदवी पातळीवर प्रत्येकी दरमहा रु. १,०००/— प्रमाणे व पदव्युत्तर पातळीवर प्रत्येकी दरमहा रु. १,५००/— प्रमाणे शिष्यवृत्ती प्रदान केली जाईल.

**९. निराधार शिष्यवृत्तीचे पोटनियम**

अ) सदरची शिष्यवृत्ती गुणवत्ता व कौटुंबिक परिस्थितीच्या निकषांच्या आधारे देण्यात येईल.

ब) सदर शिष्यवृत्तीसाठी निवड करताना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला ७० टक्के महत्त्व देण्यात येईल.

क) उर्वरित ३० टक्के गुण खालील बाबींसाठी देण्यात येतील.

१. आई व वडील हयात नसतील तर १५ गुण.

२. आई व वडील दोघांपैकी एकजण हयात असेल तर १० गुण.
(उपरोक्त अ.क्र. १ व २ साठी महानगरपालिका / नगरपालिका / ग्रामपंचायत यांनी दिलेला मृत्युचा दाखला प्रत जोडणे आवश्यक आहे.)

३. विद्यार्थी निराधार संस्थेत राहणारा असेल तर १५ गुण

ड) विद्यार्थी/विद्यार्थिनी सर्व पाल्यांमध्ये ज्येष्ठ असेल व कुटुंबाचे चरितार्थ त्याच्यावर/तिच्यावर अवलंबून असल्यास १० गुण. (यासाठी रेशनकार्डची साक्षंकित प्रत जोडणे आवश्यक आहे)

ई) विद्यार्थी/विद्यार्थिनी नाईट कॉलेज मध्ये शिकत असल्यास ०५ गुण. (यासाठी प्राचार्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.)

फ) सदर शिष्यवृत्तींची संख्या विद्याशाखानिहाय १४ राहील. नामांकन अर्ज केलेल्या पदवी व पदव्युत्तर पातळीवरील विद्यार्थ्यांची वरील निकषांच्या आधारे एकच गुणवत्ता यादी तयार करुन प्रथम असलेल्या विद्यार्थ्यांना पदवी पातळीवर प्रत्येकी दरमहा रु. १,०००/— प्रमाणे व पदव्युत्तर पातळीवर प्रत्येकी दरमहा रु. १,५००/— प्रमाणे शिष्यवृत्ती प्रदान केली जाईल. सदरची शिष्यवृत्ती १० महिने कालावधीसाठी देय राहिल.

**१०. दिव्यांग शिष्यवृत्तीचे पोटनियम**

सदरची शिष्यवृत्ती गुणवत्ता व दिव्यांगांच्या निकषांच्या आधारे देण्यात येईल.

अ) सदर शिष्यवृत्तीसाठी निवड करताना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला ७० टक्के महत्व ेण्यात येईल.

ब) उर्वरित ३० टक्के गुण खालील बाबींसाठी देण्यात येतील.

| अ. क्र. | दिव्यांगाचे प्रमाण | गुण |
|---|---|---|
| १. | ४० टक्के अपंगत्व असल्यास | ०७ गुण |
| २. | ५० टक्के अपंगत्व असल्यास | १० गुण |
| ३. | ६० टक्के अपंगत्व असल्यास | १३ गुण |
| ४. | ७० टक्के अपंगत्व असल्यास | १६ गुण |
| ५. | ८० टक्के अपंगत्व असल्यास | २० गुण |
| ६. | ९० टक्के अपंगत्व असल्यास | २५ गुण |
| ७. | १०० टक्के अपंगत्व असल्यास | ३० गुण |

..७

क) यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक यांनी दिलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

ड) सदर शिष्यवृत्तीची संख्या विद्याशाखानिहाय राहील. नामांकन अर्ज केलेल्या पदवी व पदव्युत्तर पातळीवरील विद्यार्थ्यांची वरील निकषांच्या आधारे एकच गुणवत्ता यादी तयार करुन प्रथम असलेल्या विद्यार्थ्यांना पदवी पातळीवर प्रत्येकी दरमहा रु. १,०००/— प्रमाणे व पदव्युत्तर पातळीवर प्रत्येकी दरमहा रु.१,५००/— प्रमाणे शिष्यवृत्ती प्रदान केली जाईल. सदरची शिष्यवृत्ती १० महिने कालावधीसाठी देय राहील.

## ११. गुणवंत खेळाडू शिष्यवृत्तीचे पोटनियम

अ. सदरची शिष्यवृत्ती खेळातील उल्लेखनीय कामगिरीच्या आधारे देण्यात येईल.

| | | वैयक्तिक /सांघिक कामगिरी | | |
|---|---|---|---|---|
| अ क्र | | प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक |
| १. | विद्यापीठ पातळी विभागीय/ आंतरविभ | ४ गुण | ३ गुण | २ गुण |
| २. | राज्य पातळी/अश्वमेध/क्रीडा महोत्सव | ५ गुण | ४ गुण | ३ गुण |
| ३. | अखिल भारतीय आंतर विद्यापीठ विभागीय स्पर्धा | ६ गुण | ५ गुण | ४ गुण |
| ४. | राष्ट्रीय पातळी | ७ गुण | ६ गुण | ५ गुण |
| ५. | आंतरराष्ट्रीय पातळी | ८ गुण | ७ गुण | ६ गुण |
| | एकूण | ३० गुण | २५ गुण | २० गुण |

( टिप : जो खेळाडू वरील स्पर्धांमध्ये सहभागी झालेला आहे. अशा विद्यार्थ्यास सहभागाबद्दल ०१ गुण दिला जाईल.)

अर्जासोबत आवश्यक ती प्रमाणपत्रे साक्षांकित करुन जोडणे आवश्यक आहे. तसेच शिष्यवृत्ती देताना संबंधित विद्यार्थ्यांच्या फक्त मागील वर्षातील कामगिरीचा विचार केला जाईल. तसेच संबंधित विद्यार्थ्याने शिष्यवृत्तीकरिता पात्र होण्यासाठी वरील ३० गुणांपैकी किमान ०३ गुण मिळविणे आवश्यक आहे.

सदर शिष्यवृत्तींची संख्या विद्याशाखानिहाय १४ राहील. नामांकन अर्ज केलेल्या पदवी व पदव्युत्तर पातळीवरील विद्यार्थ्यांची वरील निकषांच्या आधारे एकच गुणवत्ता यादी तयार करुन प्रथम आलेल्या पात्र विद्यार्थ्यांना पदवी पातळीवर प्रत्येकी दरमहा रु १,०००/— प्रमाणे व पदव्युत्तर पातळीवर प्रत्येकी दरमहा रु. १,५००/— प्रमाणे शिष्यवृत्ती प्रदान केली जाईल. सदरची शिष्यवृत्ती १० महिने कालावधीसाठी देय राहिल.

..८

## १२. शहीद सन्मान शिष्यवृत्तीचे पोट नियम

### शहीद सन्मान शिष्यवृत्तीचे निकष

१. सदरची शिष्यवृत्ती शहीद लष्करी, निमलष्करी जवान व शहीद पोलीस विवाहीत असल्यास पती/पत्नी व पाल्यास आणि अविवाहीत असल्यास अविवाहीत सख्खा भाऊ व अविवाहीत सख्खी बहीण यांना गुणवत्तेच्या आधारे व जोपर्यंत नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेशीत आहे. तोपर्यंत सदर शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात येईल.

२. अर्जदार यांनी शहीद लष्करी, निमलष्करी जवान व शहीद पोलिस यांचे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय / पोलीस कल्याण कक्ष व जनसंपर्क अधिकारी/तत्सम अधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. प्राचार्यांचे/अधिविभागप्रमुखांचे शिफारस पत्र जोडणे आवश्यक आहे.

३. अर्जासोबत आवश्यक ती प्रमाणपत्रे/कागदपत्रे साक्षांकित करुन जोडणे आवश्यक आहे.

## १३. पारलिंगी विद्यार्थी शिष्यवृत्ती

अ) सदर शिष्यवृत्तीसाठी निवड करताना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला ७० टक्के महत्व देण्यात येईल.

ब) उर्वरित ३० टक्के गुण खालील बाबींसाठी देण्यात येतील

क) महाराष्ट शासनाकडून पारलिंगींकरीता पारीत केलेल्या ओळखपत्राची/प्रमाणपत्राची छायांकीत प्रत जोडणे आवश्यक आहे.

ड) जोपर्यंत नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेशीत आहे. तोपर्यंत सदर शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात येईल.

सर्वसाधारण गटातील शिष्यवृत्तींची संख्या मागील वर्षी मार्च/एप्रिल मध्ये झालेल्या विद्यापीठाच्या ज्या—त्या अभ्यासक्रमाच्या / विषयाच्या परीक्षेस बसलेल्या एकूण नियमित व प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी संख्येवर अवलंबून राहील व इतर गटातील शिष्यवृत्तींचीं संख्या विद्याशाखानिहाय खालील तक्त्याप्रमाणे

सदर शिष्यवृत्तीची संख्या विद्याशाखानिहाय राहील. नामांकन अर्ज केलेल्या पदवी व पदव्युत्तर पातळीवरील विद्यार्थ्यांची वरील निकषांच्या आधारे एकच गुणवत्ता यादी तयार करुन प्रथम असलेल्या विद्यार्थ्यांना पदवी पातळीवर प्रत्येकी दरमहा रु.१,०००/— प्रमाणे व पदव्युत्तर पातळीवर प्रत्येकी दरमहा रु.१,५००/— प्रमाणे शिष्यवृत्ती दहा महिन्याकरीता प्रदान केली जाईल

| अ.क्र. | विद्याशाखा | शिष्यवृत्ती संख्या |
|---|---|---|
| १. | विज्ञान व तंत्रज्ञान | १४ |
| २. | वाणिज्य व व्यवस्थापन | १४ |
| ३. | मानव विज्ञान | १४ |
| ४. | आंतर विद्याशाखीय | १४ |

ब) शिष्यवृत्तींची संख्या निश्चित झाल्यांनतर पात्र ठरलेल्या विद्यार्थी/विद्यार्थिनींपैकी गुणवत्तेनुसार शेवटी असणा—या विद्यार्थी/विद्यार्थिनीचे गुण समान असतील तर समान गुणांच्या विद्यार्थी/विद्यार्थिनींच्या शिष्यवृत्तीची तितकीच रक्कम त्या पुढील संबंधित विद्यार्थी /विद्यार्थीनीस देय राहील.

क) सदर शिष्यवृत्तींची संख्या विद्याशाखानिहाय राहील. नामांकन अर्ज केलेल्या पदवी व पदव्युत्तर पातळीवरील विद्यार्थ्यांची वरील निकषांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करुन प्रथम असलेल्या विद्यार्थ्यांना पदवी पातळीवर प्रत्येकी दरमहा रु १,०००/— प्रमाणे व पदव्युत्तर पातळीवर प्रत्येकी दरमहा रु. १,५००/— प्रमाणे शिष्यवृत्ती प्रदान केली जाईल.

१४. **छाननी समितीचे गठन**

१. **सदर शिष्यवृत्तीसाठी आलेल्या नामांकन अर्जाची छाननी करण्यासाठी खालीलप्रमाणे छाननी समिती गठन करण्यात येईल.**

| | |
|---|---|
| • मा. कुलगुरु निर्देशित केलेले प्राध्यापक | अध्यक्ष |
| • मा. संचालक,विद्यार्थी विकास, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य (मा. कुलगुरु नियुक्त) |
| • एक प्राध्यापक, मानव विद्याशाखा, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर. | सदस्य (मा. कुलगुरु नियुक्त) |
| • एक प्राध्यापक,वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर. | सदस्य (मा. कुलगुरु नियुक्त) |
| • दोन प्राध्यापक,विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,(एक विज्ञान व एकतंत्रज्ञान) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | सदस्य (मा. कुलगुरु नियुक्त) |
| • एक क्रीडा अधिविभाग प्रमुख /संचालक, क्रीडा विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य |
| • एक वैद्यकीय अधिकारी, आरोग्य केंद, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य |
| • रेक्टर, कमवा व शिका योजना, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य |
| • उपकुलसचिव, ऑन एक्झाम, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर | सदस्य |
| • सहा.कुलसचिव पदव्युत्तर प्रवेश विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य सचिव |

२. विहीत वेळेत छाननी समितीची बैठक आयोजित करणेची जबाबदारी सदस्य सचिव यांची राहील.

१५. अ) निवड समितीचे गठन

१. सदर शिष्यवृत्तीसाठी योग्य विद्यार्थी/विद्यार्थिनींची निवड करण्यासाठी खालीलप्रमाणे निवड समिती गठीत करण्यात येईल.

| | |
|---|---|
| • मा.कुलगुरु | अध्यक्ष |
| • मा.प्र.कुलगुरु | सदस्य |
| • एक अधिष्ठाता | सदस्य (मा.कुलगुरु नियुक्त) |
| • एक व्यवस्थापन परिषद सदस्य | (व्यवस्थापन परिषद नामनिर्देशित |
| • एक विद्यापरिषद सदस्य | (विद्यापरिषद नामनिर्देशित ) |
| • एक अधिसभा सदस्य | (अधिसभेव्दारा नामनिर्देशित) |
| • एक विभागप्रमुख | सदस्य (मा.कुलगुरु नियुक्त) |
| • एक संलग्न महाविद्यालयातील प्राचार्य | सदस्य (मा.कुलगुरु नियुक्त) |
| • छाननी समिती अध्यक्ष | सदस्य |
| • मा. कुलसचिव | सदस्य |
| • मा. वित व लेखा अधिकारी | सदस्य |
| • संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | सदस्य |
| • उपकुलसचिव, पदव्युत्तर प्रवेश विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य सचिव |

२. विहीत वेळेत निवड समितीची बैठक आयोजीत करण्याची जबाबदारी सदस्य सचिव यांची राहील.

१६. शिष्यवृत्तीचे विहीत नमुन्यातील अर्ज विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील. महाविद्यालयांनी/अधिविभागांनी मान्यता प्राप्त शिक्षणसंस्थेतील विद्यार्थी/ विद्यार्थिनीचे प्राप्त नामांकन अर्जाची छाननी करुन पात्र अर्ज योग्य त्या कागदपत्राच्या पूर्ततेसह विहीत केलेल्या मुदतीत विद्यापीठाकडे पाठविणे आवश्यक आहे. सर्वसाधारण गटामध्ये द्यावयाच्या शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थी/विद्यार्थिनींची नांवे विद्यापीठामार्फत कळविण्यात/विद्यापीठ संकेत स्थळावर ठेवण्यात येतील. ज्या विद्यार्थी/विद्यार्थिनींनी अन्यत्र प्रवेश घेतला आहे अशा संभाव्य पात्र विद्यार्थ्याची माहिती तसेच बॅक खात्यांची माहिती महाविद्यालयांनी व अधिविभागांनी विद्यापीठास वेळीच कळविणे आवश्यक आहे. वेळेत ऑनलाईन न आलेल्या व अपूर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१७. **गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील**

I सदर शिष्यवृत्तीचे अर्ज दरवर्षी विद्यापीठातील सर्व अभ्यासक्रमाचे प्रवेश निश्चीत झालेनंतर २ महिन्यानंतर संकेतस्थळावर नामांकंन अर्ज ऑनलाईन भरुन त्याची हार्ड कॉपी मा. प्राचार्य/अधिविभागप्रमुख यांच्या शिफारशीसह महाविद्यालयामार्फत/ अधिविभागामार्फत पदव्युत्तर प्रवेश विभागाने पारीत केलेल्या परिपत्रकातील दिनांकास विद्यापीठ कार्यालयास सादर करावेत.

II संगणक प्रणालीमध्ये आवश्यक बदल करणे,संगणक प्रणालीमधून नामांकन अर्ज भरून घेणे तसेच महाविद्यालये/अधिविभागाकडून सॉप्टकॉपी/हार्डकॉपी मागविणे/न मागविणे या बाबतचा निर्णय/कार्यवाही विद्यापीठ प्रशासकीय स्तरावर करण्यात यावी.

III सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था/अधिविभाग यांनी शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्याची गैरहजेरी / वर्तणूक / प्रवेश रद्द इत्यादी बाबतचे बदल ३१ डिसेंबरपर्यंत विद्यापीठ कार्यालयास कळवावेत.

IV गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्याची यादी ३१ जानेवारीपर्यंत जाहीर करणेत येईल.

V गुणवत्ता शिष्यवृत्तीबाबतचा अंतिम निर्णय विद्यापीठाचा राहील.

अ) शिष्यवृत्तीसाठी गुणवत्ता यादीनुसार अर्ज केलेल्या व पात्र विद्यार्थ्यापैकी एखादा विद्यार्थी निकषाप्रमाणे शिष्यवृत्तीसाठी अपात्र ठरल्यास यांच्या पुढील विद्यार्थ्यास गुणानुक्रमे प्राधान्य देण्यात यावे यासाठी प्रत्येक शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांची दहा टक्के अधिकची प्रतीक्षा यादी तयार करण्यात येईल.

ब) सदर शिष्यवृत्तीकरिता महाविद्यालये/पदव्युत्तर अधिविभाग / मान्यता प्राप्त संस्थेकडून शिष्यवृत्तीकरिता पात्र असलेल्या विद्यार्थ्यांचे नामांकन अर्ज विहीत वेळेत प्राप्त न झाल्यास भविष्यात उद्‌भवना—या बाबींसाठी संबंधित महाविद्यालय / पदव्युत्तर अधिविभाग जबाबदार राहील.

क) शिष्यवृत्ती योजनेच्या नियमांमध्ये बदल / सुधारणा करण्याचा तसेच एखाद्या शिष्यवृत्ती धारकाबाबत वर्गातील अनुपस्थिती,
वर्तणूक इत्यादी संदर्भात प्रतिकूल अहवाल असल्यास अथवा आढळल्यास सदरची शिष्यवृत्ती काढून घेण्याचा अधिकार विद्यापीठ अधिकार मंडळाकडे राहील.

ड) शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी/विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर रक्कम तसेच मा. कुलगुरू व मा. कुलसचिव यांच्या स्वाक्षरी असलेले प्रशस्तीपत्र देण्यात येईल.

ई) विद्याशाखानिहाय सर्वाधिक गुणवत्ता मिळविणा-या पहिल्या शहरी, निमशहरी व ग्रामीण महाविद्यालयांना मा. कुलगुरू व मा. कुलसचिव यांच्या स्वाक्षरी असलेले प्रशस्तीपत्र देण्यात येईल.

फ) विद्याशाखानिहाय सर्वाधिक गुणवत्ता मिळविणा—या पहिल्या शहरी, निमशहरी व ग्रामीण महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा/अधिविभागप्रमुखांचा सत्कार समारंभ विद्यापीठाने प्रकाशीत केलेला ग्रंथ, शाल व प्रशस्तीपत्र देवून प्रतिवर्षी महाविद्यालयात/विद्यापीठ कार्यालयात विद्यापीठ प्रशासनाने निश्चित केलेल्या दिनांकास घेण्यात येईल.

- शहरी (महानगरपालिका)
- निमशहरी (नगरपालिका/नगरपरिषद)
- ग्रामीण (ग्रामपंचायत)

* * * *